# स्वतंत्र भारतातील शेती व शेती प्रश्नांचे बदलते स्वरूप

(विदर्भ अर्थशास्त्र परिषदेच्या ४७व्या वार्षिक अधिवेशनाचे अध्यक्षीय भाषण)

**डॉ. करमसिंग रजपूत**

अर्थशास्त्र विभागप्रमुख, लोकमान्य टिळक महाविद्यालय, वणी

**प्रस्तावना:**

स्वतंत्र भारताचे पहिले कृषीमंत्री डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख म्हणाले होते की, *"कृषी संस्कृती ही सर्व संस्कृतींची जननी आहे. तिचा विकास करणे जरुरी आहे. कृषी हा मानवी जीवनाच्या विकासाचा आद्य उद्योग आहे. कृषी शिवाय मानवी जीवनाच्या विकासाचा सिद्धांतच निरर्थक आहे. म्हणून शासनाने शेती विकासाकडे लक्ष दिले पाहिजे."* या पार्श्वभूमीवर भारताला स्वातंत्र्य मिळाल्यापासूनच्या सुमारे ७७ वर्षांच्या काळात भारतातील कृषी क्षेत्रात कोणकोणते बदल होत गेले व त्यामुळे भारताच्या कृषी क्षेत्रात कोणकोणत्या समस्या निर्माण झाल्या याचा आढावा घेणे उद्बोधक ठरेल. स्वतंत्र भारतातील कृषी क्षेत्रातील बदलांचे तीन टप्पे पुढीलप्रमाणे आहेत.

**१. स्वातंत्र्योत्तर हरितक्रांतीपूर्व काळ १९४७-१९६६:**

स्वातंत्र्याच्या वेळी झालेल्या भारत-पाकिस्तान फाळणीमुळे मोठ्या प्रमाणावर सुपीक व बागायती जमीन पाकिस्तानच्या वाट्याला गेली. तांदूळ व गहू पिकविणारा मोठा प्रदेश पाकिस्तानात गेला. स्वतंत्र भारताच्या वाट्याला सिंचनाची सोय असलेली अत्यंत कमी बागायती जमीन व लोकसंख्या मात्र जास्त आल्यामुळे स्वतंत्र झाल्या-झाल्या भारतात अन्नधान्याची टंचाई निर्माण झाली. इ.स. १९५१ मध्ये भारताची अन्नधान्य निर्माण करण्याची क्षमता केवळ ५.५ कोटी टन एवढी होती व त्यावेळी भारताची लोकसंख्या मात्र ३६.१० कोटी होती. या लोकसंख्येपैकी त्यावेळी सुमारे ७५% लोकसंख्या शेतीवर अवलंबून होती. सन १९५१ मध्ये भारताच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नात शेती उत्पन्नाचा वाटा सुमारे ५७% होता. याचाच अर्थ सन १९५१ मध्ये देशातील एकूण लोकसंख्येपैकी ७५% लोकसंख्येच्या वाट्याला एकूण राष्ट्रीय उत्पन्नापैकी ५७% उत्पन्न येत होते. त्यावेळी भारतातील शेतकरी परंपरागत पद्धतीने शेती करीत असे. त्यावेळी शेतीत काम करणारा मनुष्यबळसुद्धा मोठ्याप्रमाणात उपलब्ध असल्याने मजुरीचे दर अत्यंत कमी होते. मुख्य म्हणजे बियाणे, शेणखत, शेती अवजारे व बैल शेतकऱ्याच्या घरचेच असल्यामुळे व मजुरांची मजुरी सुद्धा धान्याच्या स्वरूपात द्यावी लागत असल्यामुळे शेतकऱ्याला शेतमालाचे उत्पादन घेताना रोख स्वरूपात फारच कमी खर्च करावा लागत असे. शेतकरी त्यावेळी परंपरागत पद्धतीने शेती करीत असल्यामुळे शेती उत्पादनाचे प्रती हेक्टरी उत्पादन कमी असले तरी मुळात शेतमालाचा उत्पादन खर्च कमी असल्यामुळे शेतकऱ्याचा ताळेबंद अधिक्याचा होता. दुसरे म्हणजे त्या काळात आजच्याप्रमाणे अनावश्यक भौतिक वस्तूंची बाजारात उपलब्धताच नसल्याने शेतकऱ्यांना अनावश्यक खर्च कमी होता. त्यामुळे तो सुखी व समाधानी होता. तथापि शेती क्षेत्रातील अनिश्चितता कायम होती. अन्नधान्य वाढीच्या तुलनेत लोकसंख्या वाढीचा दर जास्त असल्याने व आलटून पालटून येणाऱ्या दुष्काळामुळे सन १९४७-१९६५ या काळात देशात तीव्र अन्नटंचाई निर्माण झाली होती. त्यामुळे देशातील जनतेचे पोट भरण्यासाठी त्यावेळी भारत सरकारने अमेरिकेसोबत पी. एल. ४८० करार करून अमेरिकेकडून मोठ्या प्रमाणावर धान्य आयात करण्याचा निर्णय घेतला. देशातील अन्नधान्यटंचाई समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी तत्कालीन केंद्र सरकारने हरितक्रांतीचा पर्याय स्वीकारला.

**२. हरितक्रांती ते नवीन आर्थिक धोरणापर्यंतचा काळ १९६६-१९९१:**

संकरित बियाणे, रासायनिक खते व कीटकनाशके या त्रीसूत्रीचा वापर करून अधिकाधिक धान्य पिकविण्याच्या तंत्राला हरितक्रांती असे संबोधले गेले. भारतात तत्कालीन (१९६५-६६) कृषी मंत्रालयाचे सल्लागार डॉ. एम. एस. स्वामीनाथन व तत्कालीन कृषी

मंत्री सी. सुब्रमण्यम यांनी डॉ. नॉर्मन बोरलॉग यांच्या सहकार्याने सन १९६६-६७ मध्ये या तंत्राचा अवलंब करण्यास सुरुवात केली. त्यामुळे जागतिक स्तरावर डॉ. नॉर्मन बोरलॉग तर भारतात सी. सुब्रमण्यम व डॉ. एम. एस. स्वामीनाथन यांना हरितक्रांतीचे जनक संबोधले जाते. त्यांच्या अपेक्षेनुसार संपूर्ण देशात या तंत्राचा वापर केल्यामुळे धान्य उत्पादनात भरमसाठ वाढ झाली. हरितक्रांतीपूर्वी सन १९५०-५१ मध्ये आपल्या देशाची अन्नधान्य उत्पादन क्षमता वार्षिक सुमारे ५.५ कोटी टन एवढीच होती. मात्र सन १९६६ च्या हरितक्रांतीमुळे ती तीन पटीपेक्षा जास्त वाढून सन१९९०-९१ मध्ये १७.६४ कोटी टन तर २०२३ मध्ये ती ३३.०५ कोटी टनापर्यंत पोहोचली. अन्नधान्याच्या बाबतीत देश सध्या स्वावलंबीच नाही तर काही प्रमाणात अन्नधान्य निर्यात करण्याच्या क्षमतेचा झाला आहे. एकीकडे हरितक्रांतीच्या तंत्राचा वापर करून शेतकऱ्यांनी अन्नधान्याचे भरघोस उत्पादन केले. परंतु दुसरीकडे बी-बियाणे, रासायनिक खते व कीटकनाशके यांच्या बाबतीत शेतकरी दिवसेंदिवस परावलंबी होत गेला. हरितक्रांतीअंतर्गत वापरण्यात येणाऱ्या संकरित बियाण्यांची उत्पादकता ही रासायनिक खते व कीटकनाशके यांच्या वापरावर अवलंबून असल्याने रासायनिक खते व कीटकनाशकांच्या खरेदीवर शेतकऱ्यांचा प्रचंड खर्च होऊ लागला. हरितक्रांतीमुळे शेतमाल उत्पादन खर्चात भरमसाठ वाढ झाली. परंतु उत्पादन खर्च वाढीच्या तुलनेत शेतमालाच्या किमान आधारभूत किमतींत (MSP-Minimum Support Prices) वाढ न झाल्याने शेतकऱ्यांचा ताळेबंद बिघडायला लागला. असे असले तरी सन १९९१ पर्यंत देशाची अर्थव्यवस्था शेतमालाच्या आयातीसाठी खुली झालेली नसल्यामुळे येथील शेती व्यवसाय शेतकऱ्यांना आपली उपजीविका करण्यासाठी समाधानकारक होता असे म्हणावयास वाव आहे.

**हरितक्रांतीचे परिणाम:**

भारतात जी हरितक्रांती घडवून आणली गेली तिचे काही अनुकूल तर काही प्रतिकूल परिणाम झाल्याचे आपणास दिसून येते. साधारणपणे हरितक्रांतीच्या अनुकूल परिणामांमध्ये १. अन्नधान्यात कमालीची वाढ, २. शेतीचे व्यापारीकरण, ३. शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थिती सुधारणा, ४. औद्योगिक विकासात वाढ, ५. आर्थिक विकासात वाढ, ६. शेतकऱ्यांच्या राहणीमानात वाढ, ७. शेतीतील गुंतवणुकीत वाढ, ८. रोजगारात वाढ, ९. सिंचन क्षेत्रात वाढ इत्यादी परिणामांचा समावेश होतो. हरित क्रांतीच्या काळात अन्नधान्याच्या उत्पादनात खालील प्रमाणे वाढ झाल्याचे दिसून येते.

ज्याप्रमाणे हरितक्रांतीचे भारतीय शेती क्षेत्रावर काही अनुकूल परिणाम झाले त्याचप्रमाणे काही प्रतिकूल परिणाम सुद्धा झाल्याचे आढळून येते. ते पुढील प्रमाणे १. भांडवलवादी शेतीचा प्रारंभ, २. आर्थिक विषमतेत वाढ, ३. ग्रामीण बेरोजगारीत वाढ, ४. नि:सत्व अन्नधान्याची निर्मिती, ५. रासायनिक खते व तणनाशकांचा शेती व मानवी आरोग्यावर घातक परिणाम, ६. शेती आदानांच्या बाबतीत शेतकऱ्यांच्या परावलंबनात वाढ, ७. सधन शेतकऱ्यांना अधिक लाभ इत्यादी. अशाप्रकारे हरितक्रांतीचे काही अनुकूल व काही प्रतिकूल परिणाम आढळून येतात. आपणास प्रतिकूल परिणामांची तीव्रता कमी करण्यासाठी व शाश्वत शेतीसाठी हळूहळू रासायनिक शेतीकडून नैसर्गिक (सेंद्रिय) शेतीकडे शेतकऱ्यांना वळवावे लागेल.

**३. नवीन आर्थिक धोरणानंतरचा काळ १९९१-२०२३:**

भारत सरकारने दि. २४ जुलै १९९१ रोजी भारतीय अर्थव्यवस्थेला आर्थिक संकटांतून बाहेर काढण्यासाठी नवीन आर्थिक धोरण स्वीकारले. सन १९४८ मध्ये लागू करण्यात आलेल्या गॅट (GATT-General Agreement on Tariff and Trade) कराराने देशांदेशांतील व्यापार बऱ्याच प्रमाणात खुला झाला होता. परंतु गॅट मध्ये शेती क्षेत्राचा समावेश केलेला नव्हता. गॅटच्या जागी नव्याने १ जानेवारी १९९५ पासून स्थापन झालेल्या विश्व व्यापार संघटन (WTO- World Trade Organization) मध्ये मात्र शेतमालाकरिता जागतिक बाजार खुला करण्यासाठी शेती क्षेत्राचा समावेश करण्यात आला. गॅटच्या उरुग्वे फेरी दरम्यान वाटाघाटी झालेल्या सर्वात महत्त्वाच्या करारांपैकी कृषी करार हा एक महत्त्वाचा करार होता.

या करारानुसार शेतमालाच्या खरेदी विक्रीसाठी जागतिक बाजार खुला करण्याचे ठरले व कृषी अनुदानांसंबंधी पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले-

**१.** १९८६-८८ हा काळ पायाभूत मानून विकसित देशांनी त्यांच्या देशांमध्ये देण्यात येणाऱ्या कृषी अनुदानांमध्ये ६ वर्षांच्या काळात २०% ने कपात करावयाची तर विकसनशील देशांनी १० वर्षांच्या काळात आपल्या कृषी अनुदानांमध्ये १३% कपात करावयाची असे ठरले. अविकसित देशांनी मात्र अशा प्रकारची कोणतीही कपात करण्याची अपेक्षा नव्हती.

**२.** दुसरे म्हणजे आयात करात विकसित देशांनी ६ वर्षात सरासरी ३६% तर विकसनशील देशांनी १० वर्षांत २४% कपात करावयाचे ठरले. अविकसित देशांना मात्र कोणतेही बंधन घालण्यात आले नाही.

विकसित देशांनी चलाखी करून कृषी अनुदानाची खालीलप्रमाणे तीन पेट्यांमध्ये विभागणी केली.

**१. हिरवी पेटी अनुदाने (Green Box Subsidies):** यांत सरकारद्वारे दिल्या जाणाऱ्या खालील कृषी अनुदानांचा समावेश करण्यात आला. जसे-शेतकऱ्यांना उत्पन्न समर्थनाची (income Support) तरतूद, अन्नसुरक्षा, संशोधन आणि विकास, रोग नियंत्रण आणि पायाभूत सुविधा इत्यादी.

**२. निळी पेटी अनुदाने (Blue Box Subsidies):** यांत सरकारद्वारे दिल्या जाणाऱ्या खालील कृषी अनुदानांचा समावेश करण्यात आला. जसे-शेतमालाचे उत्पादन मर्यादित करणे, जमीन इतर उपयोगासाठी वापरण्यास प्रोत्साहन देणे, उत्पादन कोटा निश्चित करणे इत्यादी. सध्या या पेटीतील अनुदानांवर खर्च करण्यावर कोणतीही मर्यादा नाही.

**३. पिवळी पेटी अनुदाने (Amber Box Subsidies):** यांत खालील कृषी अनुदानांचा समावेश होतो. उदा. विजेवरील अनुदान, बियाण्यांवरील अनुदान, रासायनिक खतांवरील अनुदान, सिंचनावरील अनुदान, शेतमालाची किमान हमीभावाने खरेदी इत्यादी. ही अनुदाने आंतरराष्ट्रीय कृषीमालाचा व्यापार विकृत करणारी अनुदाने आहेत असे घोषित करण्यात आले व ती हळू हळू कमी करण्याचे ठरले.

वरील कृषी अनुदानाच्या पेट्यांमधील हिरव्या पेटीतील अनुदाने विकृत मानली गेली नाहीत, निळ्या पेटीतील अनुदाने कमी विकृत मानली गेली तर पिवळ्या पेटीतील अनुदाने गंभीर विकृत मानली गेली आहेत. पिवळ्या पेटीतील कृषी अनुदाने बाजार गंभीरपणे विकृत करीत असल्यामुळे ती कमी करण्यावर विकसित देशांचा भर आहे. जेंव्हा की भारतासारखे विकसनशील देश जी काही थोडीफार कृषी अनुदाने आपल्या शेतकऱ्यांना देतात त्यांचा समावेश पिवळ्या पेटीमध्येच होतो. ती कमी केल्यास भारतातील शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान ठरलेले आहे.

**सरकारला कृषी क्षेत्रात जागतिकीकरण का हवे?**

शेतीत जागतिकीकरण आणल्यास निरनिराळ्या कंपन्यांबरोबर करार करून शेतकरी आपली शेती करतील. याचा अर्थ शेती व शेतकऱ्यांना सरकारकडून अनुदान द्यावे लागणार नाही. त्यांचा शेतमाल किमान हमीभाव देऊन खरेदी करावा लागणार नाही तसेच शेतकऱ्यांना कर्ज सुद्धा कंपन्याच देतील व त्यांचा शेतमालही कंपन्याच विकत घेतील. कृषी क्षेत्रात जागतिकीकरण आणल्यामुळे सरकारला कायमस्वरूपी शेती अनुदाने, शेतमालाची हमीभावाने खरेदी व शेतीसाठी कर्ज पुरवठा करणे या कटकटीतून मुक्त होता येईल. यासाठीच सरकारला शेती क्षेत्रात जागतिकीकरण हवे आहे.

**जागतिकीकरणाचा भारतीय शेती क्षेत्रावरील परिणाम:**

जागतिकीकरणाचा भारतीय शेतीवरील परिणामाबाबत इकॉलॉजिस्ट या नियतकालिकाचे संपादक 'एडवर्ड गोल्डस्मिथ' दि. २८ मार्च २००३ च्या आपल्या नियतकालिकाच्या अंकात म्हणाले होते की, *"२-३ एकर शेती असलेले भारतातील शेतकरी जागतिकीकरणाच्या झंझावातास कसे तोंड देणार? ते तगूच शकणार नाहीत, शेतीतून उठवले जाऊन सारे झोपडपट्ट्यांमध्ये ढकलले जातील. शेतकरी असे देशोधडीला लागले की त्यांच्यावर अवलंबून असलेले शेतमजूर, छोटे दुकानदार, कारागीर, सेवक हे सगळेच आपापल्या धंद्यातून उखडले जातील. सुमारे ७० कोटी लोकांना देशोधडीला लावण्याचा परिणाम काय होईल याची कल्पना करू शकता? जगाच्या इतिहासात असे कोणीही केलेले नाही. परंतु भारताच्या जागतिकीकरणाची ती अपरिहार्य परिणती असेल. त्याने*

*भारत उद्ध्वस्त होईल."* जागतिकीकरणाचे भारतीय कृषी क्षेत्रावर पुढील निरनिराळे परिणाम झाल्याचे दिसून येते.

**१. नवीन आर्थिक धोरणामुळे भारतातील शेतीक्षेत्र कोलमडले:** प्रथम पंचवार्षिक योजनेत भारताच्या कृषी क्षेत्रावर एकूण योजना खर्चापैकी तब्बल ३१% खर्च करण्यात आला. त्यानंतर तो हळूहळू कमी होत गेला, तर शेवटच्या बाराव्या पंचवार्षिक योजनेत एकूण योजना खर्चाच्या केवळ १७.२५% खर्च कृषी क्षेत्रावर करण्यात आला. ज्या कृषी क्षेत्रावर आजही सुमारे ६०% लोकसंख्येची उपजीविका चालते त्यावर पंचवार्षिक योजनेतील एकूण खर्चापैकी केवळ १७% खर्च झाल्यामुळेच शेती क्षेत्रात गंभीर समस्या निर्माण झाल्याचे दिसून येते. थोडक्यात जागतिकीकरणानंतर दिवसेंदिवस कृषी क्षेत्रातील सार्वजनिक गुंतवणुकीत कपात केली जात आहे.

**२. शेतमालाच्या आयात खुली करण्याचा देशातील शेतकऱ्यांना फटका:** आयात खुलीकरणाच्या प्रक्रियेअंतर्गत भारत सरकारने १०,००० परदेशी वस्तूंच्या आयातीवरील संख्यात्मक बंधने काढून टाकली. या प्रक्रियेअंतर्गत भारत सरकारने कापूस, तेलबिया, तेल, भाजीपाला, बटाटे, नारळ, सफरचंद, लसूण, डाळिंब, बेदाणे, दूध पावडर इत्यादी शेतमाल तसेच शेतमाल आधारित वस्तू व पशुजन्य वस्तूंवरील आयात निर्बंध उठविण्यात आले व त्यांची आयात खुली केली. परिणामी मोठ्याप्रमाणावर विदेशातून शेतमालाची आयात वाढल्याने भारतात ज्वारी, बाजरी, कापूस, सोयाबीन, गहू, खाद्यतेल, रबर इत्यादी शेतमालाच्या किमती घसरल्या.

**३. शेती आदानांच्या किमतीत व मजुरी खर्चात भरमसाठ वाढ:** शेती लागवडीसाठी आवश्यक असणाऱ्या शेती आदानांच्या किमतीत सन १९९१ पासून भरमसाठ वाढ झाली. मार्च १९९० मध्ये डिझेल प्रति लिटर ४.०८ रू. होते ते वाढून मार्च २०२३ मध्ये तब्बल प्रति लिटर ९४.२७ रू. झाले तर त्यावेळी पेट्रोल प्रति लिटर ९.८४ रू. होते ते वाढून मार्च २०२३ मध्ये १०६ रू. प्रति लिटर झाले. रासायनिक खते, बियाणे, किटकनाशके इत्यादींच्या किमती १९९० च्या तुलनेत २०२३ मध्ये ४ ते ५ पटींनी वाढलेल्या आहेत. त्यामुळे शेतमाल उत्पादनाच्या खर्चात भरमसाठ वाढ झालेली आहे. सोबतच जागतिकीकरणानंतर महागाईचा दर सातत्याने वाढल्याने शेतमजुरांच्या मजुरीत वाढ होत गेली.

**४. शेतमाल हमीभावाच्या तुलनेत उत्पादन खर्चात भरमसाठ वाढ:** जागतिकीकरणानंतर शेती आदानांच्या किमती प्रचंड वाढल्याने शेतमाल उत्पादन खर्चात भरमसाठ वाढ झाली. राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठातील कृषी अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. डी. बी. यादव व डॉ. पी. एन. शेंडगे यांच्यासह २५ कृषी शास्त्रज्ञांनी संयुक्तरित्या केलेल्या अभ्यासानुसार सन १९९२-९३ ते २०१२-१३ या २० वर्षांच्या काळात महाराष्ट्रातील कापूस, ऊस, तुर, उडीद, मूग, चना, सूर्यफूल, भुईमूग, सोयाबीन इत्यादी शेतमालाच्या उत्पादन खर्चात सरासरी,२००% ने वाढ झाली. परंतु याच काळात उपरोक्त शेतमालाच्या हमीभावात सरासरीने केवळ १००% च वाढ झाली. (पहा दै. लोकसत्ता दि.२४ सप्टेंबर२०१३) याच अभ्यासानुसार कापूस पिकाच्या उत्पादन खर्चात वरील २० वर्षात २६७% नी वाढ झाली मात्र कापसाच्या हमीभावात केवळ ८५% च वाढ झाली. त्यामुळेच कापूस उत्पादक मेटाकुटीस आले. थोड्याबहुत फरकाने शेतमाल उत्पादन खर्चाबाबत व शेतमालाच्या हमीभावाबाबत संपूर्ण देशात हीच परिस्थिती आढळून येते.

**५. बी-बियाण्यांच्या बाबतीत शेतकरी परावलंबी झाला:** हरितक्रांतीनंतर अधिक उत्पादन देणाऱ्या संकरित बियाणांची निर्मिती होऊ लागल्याने व असे बियाणे दरवर्षी बाजारातून विकत घ्यावे लागत असल्यामुळे शेतकरी बियाण्यांच्या बाबतीत परावलंबी झाला आहे. मॉंसेंटो या अमेरिकन कंपनीने बी. टी. तंत्रज्ञानाचा शोध लावला व त्यावर स्वामित्व हक्क निर्माण केला. कोट्यावधी रुपये स्वामीत्व हक्क (रॉयल्टी) घेऊन असे बी.टी. तंत्रज्ञानयुक्त कापसाचे बियाणे तयार करण्याची अन्य कंपन्यांना मॉंसेंटो कंपनीने परवानगी दिली. स्वाभाविकच शेतकऱ्यांना असे बियाणे देशी बियाण्यांपेक्षा खूप महाग पडू लागले व प्रत्येक वेळी ते बाजारातून विकत घेणे भाग पडल्यामुळे बियाण्यांच्या खरेदी बाबतीत शेतकऱ्यांच्या परावलंबनात आणखी वाढ झाली.

**६. ग्रामीण भागातील शेतीवर आधारित व अन्य लघु उद्योगांवर संकट:** जागतिकीकरणानंतर शेतमालावर आधारित प्रक्रियाउद्योग व ग्रामीण भागातील अन्य लघुउद्योग तयार करीत असलेल्या वस्तू राष्ट्रीय व बहुराष्ट्रीय महाकाय कंपन्या सुद्धा तयार करू लागल्याने ग्रामीण भागातील असे शेती आधारित व अन्य लघुउद्योग संकटात सापडून बंद पडू लागले आहेत.

**८. बिगरशेती कामासाठी जमिनीचा वाढता वापर:** जागतिकीकरणानंतर नवीन रस्त्यांची निर्मिती व जुन्या रस्त्यांचा विस्तार करण्यासाठी तसेच औद्योगिक विकासाच्या नावाखाली बिगरशेती कामासाठी जमिनीचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढला. सेझच्या नावाखाली मोठ्याप्रमाणावर शेतकऱ्यांच्या जमिनी ताब्यात घेतल्या गेल्यात. वाढते शहरीकरण, कारखान्यांच्या संख्येत होणारी वाढ, पर्यटन केंद्रे, क्रीडा संकुले, मनोरंजन केंद्रे, विमानतळ, रस्ते व रेल्वे मार्गांची निर्मिती इत्यादीमुळे मोठ्याप्रमाणावर शेत जमिनीचे बिगरशेत जमिनीत रूपांतर होत आहे.

**११. शेतकरी आत्महत्यांमध्ये प्रचंड वाढ:** साधारणपणे शेतमाल उत्पादन खर्चात भरमसाठ वाढ, वाढता कर्जबाजारीपणा, वाढती महागाई, नैसर्गिक आपत्ती, हवामान बदलाचा फटका, कोरडवाहू शेती,सरकारची शेतकरी विरोधी धोरणे, पर्याप्त पतपुरवठ्याच्या सोयींचा अभाव, शेतमालाला मिळणारा कमी भाव, पर्यायी रोजगार संधीचा अभाव, कौटुंबिक कलह, मुला मुलींचे शिक्षण व लग्नकार्यावरील खर्च, सावकाराची वाईट वागणूक इत्यादी कारणांमुळे शेतकरी संकटात सापडून आत्महत्या करू लागले आहेत. १९९५ पासून देशात शेतकरी आत्महत्यांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झालेली दिसून येते. सन १९९५-२०२२ या काळात राष्ट्रीय गुन्हे नोंद विभागाच्या आकडेवारीनुसार संपूर्ण देशात सुमारे ४ लक्ष शेतकऱ्यांना आपले प्राण गमवावे लागले आहेत.

**१२. नोटबंदीचा शेतीला जबर फटका:** माननीय पंतप्रधानांनी अचानकपणे ८ नोव्हेंबर २०१६ रोजी रात्री ८ वाजता दूरदर्शनवर येऊन देशात नोटबंदीची घोषणा केली. या नोटबंदीचा बांधकाम क्षेत्र, छोटे उद्योग व कृषी क्षेत्रातील मजुरांना तसेच अल्पभूधारक शेतकऱ्यांना फटका बसल्याचे भारतीय मजदूर संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष **साजी नारायण** यांनी म्हटले. नोटबंदीमुळे शेतीसाठी आवश्यक असणाऱ्या बियाणे, खते व अन्य वस्तू खरेदी करण्यासाठी शेतकऱ्यांना पुरेशा प्रमाणात रोकड उपलब्ध न झाल्यामुळे बहुतांश शेतकरी वेळेवर पेरणी करू शकले नाहीत. थोडक्यात नोटबंदीमुळे शेतीला जबर फटका बसल्याचे दिसून आले.

**१३. हवामान बदलाचा शेतीवरील परिणाम:** जागतिकीकरणाच्या काळात जगभर औद्योगिकीकरणात प्रचंड वाढ झाली आहे. उद्योग चालविण्यासाठी मोठ्या प्रमाणावर विजेची गरज भासत असल्याने ठिकठिकाणी कोळशावर आधारित मोठमोठे वीज प्रकल्प अस्तित्वात आले. या वीज प्रकल्पांमधून व मोठ्या संख्येने निर्माण झालेल्या उद्योगांमधून प्रचंड प्रमाणात कार्बन डाय-ऑक्साइड वायू वातावरणात सोडला जातो. परिणामी तापमानात वाढ होते. अशा तापमान वाढीमुळे हवामान बदल होऊन पाऊस कमालीचा लहरी झाला आहे. नको तेव्हा अति पाऊस पडणे मात्र हवा तेव्हा मोठी उघाड (खंड) देणे हे प्रकार हल्ली वारंवार घडत आहेत. हवामान बदलामुळे आज देशातील एकूण लागवडीखालील जमिनीपैकी सुमारे दोन तृतीयांश क्षेत्रात नेहमीच दुष्काळ/अवर्षणास तोंड द्यावे लागते. तर देशातील सुमारे ४ कोटी हेक्टर शेतीतील पिकांचे पुरामुळे नुकसान होत असल्याचे दिसून येते. एकंदरीतच शेतीला हवामान बदलाचा जबर फटका बसत आहे.

**१४. नवीन कृषी कायद्यांची शेतकऱ्यांवर टांगती तलवार:** भारताने नवीन आर्थिक धोरण स्वीकारल्यापासून भारत सरकार सातत्याने शेती क्षेत्रात शेतकरी विरोधी कायदे पास करीत आहे. सन २००३ व २००६ मधील कृषी उत्पन्न बाजार समिती मॉडेल ॲक्ट तसेच सप्टेंबर २०२० मधील तीन वादग्रस्त कृषी कायदे हे याचे उत्तम उदाहरण आहे. पंजाब, हरियाणा व उत्तर प्रदेश या राज्यांतील शेतकऱ्यांनी जबर विरोध केल्यामुळे केंद्र सरकारने तब्बल एक वर्षानंतर तीन वादग्रस्त कृषी कायदे मागे घेतले. असे असले तरी या तीन कृषी कायद्यांचा अभ्यास करून ते पुन्हा लागू करण्यासाठी केंद्र सरकारने एक समिती नेमली असून लवकरच त्या समितीचा अहवाल सादर होणार आहे. तो अहवाल आल्यानंतर पुन्हा हे वादग्रस्त कृषी कायदे नवीन स्वरूपात लागू करण्याचा केंद्र सरकारचा मानस आहे.

त्यामुळे अजूनही त्या कायद्यांची शेतकऱ्यांच्या डोक्यावर टांगती तलवार आहे असे पाशा पटेल यांच्या वक्तव्यावरून दिसून येते.

**भारतीय शेती पुढील आव्हाने :**

**१. कोरडवाहू जमिनीचे मोठे प्रमाण:** देशात आजही एकूण जमिनीपैकी सुमारे ६०% जमीन कोरडवाहू स्वरूपाची असून ती पूर्णतः निसर्गावर अवलंबून आहे. अशा शेतीतून वर्षाकाठी केवळ एकच पीक घेता येते व त्याची सुद्धा शेवटपर्यंत खात्री नसते. त्यामुळे अशा शेतीवर जगणाऱ्या शेतकऱ्यांची अवस्था अत्यंत बिकट आहे.

**२. शेती आदाने खरेदी करताना शेतकऱ्यांची होणारी लूट:** आजही भारतात मोठ्या प्रमाणावर अशिक्षित लोक शेती क्षेत्रात कार्यरत आहेत. दुसरीकडे बियाणे, रासायनिक खते व कीटकनाशकांची नावे इंग्रजीत असल्याने अशिक्षित किंवा कमी शिकलेल्या लोकांना ती नावे व त्यांतील घटक वाचता येत नाहीत. परिणामी अनावश्यक तसेच निकृष्ट दर्जाची खते, कीटकनाशके व बी-बियाणे शेतकऱ्यांना विकली जातात. थोडक्यात शेती अवजारे, बी-बियाणे, रासायनिक खते व कीटकनाशके इत्यादींची खरेदी करताना अशिक्षित व कमी शिक्षित शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणावर लूट होते.

**४. शेतीचा ताळेबंद जुळवण्याची समस्या:** जागतिकीकरणापूर्वी भारतातील शेती श्रमावर आधारित होती. जागतिकीकरणानंतर मात्र ती भांडवल आधारित झाली. शेत लागवडीसाठी आवश्यक असणारी बी-बियाणे, रासायनिक खते, कीटकनाशके व अन्य वस्तूंच्या खरेदीसाठी भरमसाठ खर्च येऊ लागला. मात्र त्या तुलनेत शेतमालाला बाजारात योग्य भाव मिळत नसल्याने शेतकऱ्याला आपला उत्पन्न-खर्चाचा ताळेबंद जुळविणे अशक्य झाल्याने तो आर्थिक संकटात सापडला आहे.

**५. विकसित देशांत दिले जाणारे प्रचंड कृषी अनुदान:** जागतिकीकरणानंतर विकसित देशांमध्ये मोठ्या प्रमाणात कृषी अनुदान दिल्या जाऊ लागले. भारतात मात्र जागतिकीकरणानंतर जे काही थोडेफार कृषी अनुदान पूर्वी दिल्या जात होते त्यातही डब्ल्यूटीओने कपात करावयास सांगितले. त्यामुळे सध्या भारतीय शेतकऱ्यांना तुटपुंजे कृषी अनुदान मिळते. जागतिक व्यापार खुला झाल्यामुळे विदेशातील अनुदान प्राप्त शेतमाल देशात आयात होऊ लागला व येथील शेतमालाचे भाव पडले. त्यामुळे देशातील शेतकरी संकटात सापडले.

**विदर्भातील कापूस व धान पिकांची वर्तमान स्थिती**

विदर्भाचे प्रामुख्याने पश्चिम विदर्भ (अमरावती विभाग) व पूर्व विदर्भ (नागपूर विभाग) असे दोन भाग पडतात. पश्चिम विदर्भात (अमरावती, अकोला, यवतमाळ, वाशिम व बुलढाणा) प्रामुख्याने कापूस पिकाची लागवड केली जाते तर पूर्व विदर्भात वर्धा जिल्हा वगळता (गडचिरोली, गोंदिया, भंडारा, नागपूर व चंद्रपूर) प्रामुख्याने धान पिकाची लागवड केली जाते. थोडक्यात पश्चिम विदर्भाला कापूस पट्टा तर पूर्व विदर्भाला धानपट्टा म्हणून ओळखले जाते.

**कापूस पिकाबाबत विदर्भाची स्थिती** :

संपूर्ण भारतात दरवर्षी सुमारे १२५ लाख हेक्टर क्षेत्रावर कापसाची लागवड होते. त्यापैकी महाराष्ट्रात सुमारे ४२ लाख हेक्टर क्षेत्रावर (३४%) कापसाची लागवड होते. संपूर्ण देशात दरवर्षी सुमारे ३५०-४०० लाख गाठी कापसाचे उत्पादन होते. तर महाराष्ट्रात साधारणपणे दरवर्षी सुमारे १०० लाख गाठींचे उत्पादन (१ गाठ=१७० किलो रुई) होते. महाराष्ट्रातील एकूण कापूस लागवड क्षेत्रापैकी सुमारे ५२% (२२ लाख हेक्टर) कापसाचे क्षेत्र विदर्भात आहे. तसेच महाराष्ट्रातील एकूण कापूस उत्पादनापैकी सुमारे ६२% कापसाचे उत्पादन विदर्भात, २६% उत्पादन मराठवाड्यात तर उर्वरित महाराष्ट्रात केवळ १२% कापसाचे उत्पादन होते. याचा अर्थ महाराष्ट्रातील कापूस उत्पादनापैकी सर्वाधिक कापूस उत्पादन विदर्भात होत असूनही कापसावर प्रक्रिया करणारे उद्योग मात्र विदर्भात नगण्य आहेत. सन २०१८ नुसार महाराष्ट्रात एकूण १३० सुत गिरण्या आहेत. त्यापैकी ज्या सोलापूर जिल्ह्यात राज्याच्या एकूण कापूस लागवड क्षेत्रापैकी केवळ ०.२% लागवड क्षेत्र आहे तेथे एकूण १३० सूतगिरण्यांपैकी तब्बल ४०% म्हणजे ५२ सूतगिरण्या आहेत. विदर्भात एकूण १४ सूतगिरण्या असून त्यापैकी पूर्ण कार्यक्षमतेने केवळ ३ सूतगिरण्या कार्यरत आहेत. कापसाच्या बाबतीत स्थानिक ठिकाणच्या कच्च्या

मालावर तेथेच निरनिराळे प्रक्रिया उद्योग उभे करणे हे नैसर्गिक तत्त्व सुद्धा विदर्भात न पाळल्या गेल्यामुळे येथील कापसावर आधारित अर्थव्यवस्था पूर्णतः कोलमडली असून या कापूसपट्ट्यातील असंख्य शेतकरी आत्महत्या करीत असल्याचे दिसून येत आहे. वास्तविक पाहता विदर्भातील कापूस पट्ट्यात जिनिंग-प्रेसिंग्स, सूतगिरण्या, कापड गिरण्या तसेच सरकीपासून तेल तयार करणाऱ्या तेलगिरण्या स्थापन करून संपूर्ण कापसावर विदर्भातच पूर्ण प्रक्रिया व्हावयास हव्यात. डॉ. एम. एस. स्वामीनाथन आयोगाने सुचविल्याप्रमाणे विदर्भातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांना कापसाच्या उत्पादन खर्चाच्या दीडपट किमान हमीभाव मिळणे आवश्यक आहे. मात्र सध्या विदर्भातील कापसाची सरासरी उत्पादकता प्रति एकर ४ क्विंटल असून कापसाचा प्रति एकर उत्पादन खर्च हा सुमारे ३२००० रू. एवढा आहे. म्हणजेच कापसाचा प्रति क्विंटल उत्पादन खर्च ८००० रू. असल्याचे दिसून येते. मात्र केंद्र सरकारने हंगाम २०२३-२४ करिता मध्यम धाग्याच्या कापसासाठी प्रति क्विंटल ६६२० रू. तर लांब धाग्याच्या कापसासाठी प्रति क्विंटल ७०२० रू. किमान हमीभाव जाहीर केलेले आहेत. शासनाने जाहीर केलेल्या किमान हमीभावाने सुद्धा बाजारात शेतकऱ्यांच्या कापसाची खरेदी होत नसल्यामुळे कापूस लागवडीचा व्यवसाय आतबट्ट्याचा ठरल्याची कापूस उत्पादकांची भावना आहे.

**धान पिकाबाबत विदर्भाची स्थिती:**

खरीप हंगाम २०२२-२३ मध्ये महाराष्ट्रात एकूण १५.५५ लाख हेक्टर क्षेत्रावर धानाची लागवड करण्यात आली. त्यापैकी पूर्व विदर्भात (नागपूर विभाग) ८.३६ लाख हेक्टर (५३.७६%) क्षेत्रावर भात लागवड करण्यात आली. विदर्भातील ११ जिल्ह्यांपैकी पूर्व विदर्भातील भंडारा, गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर व नागपूर या पाच जिल्ह्यांमध्ये भात हे खरिपातील प्रमुख अन्नधान्य पीक आहे. महाराष्ट्रात प्रती हेक्टरी भात उत्पादकता सरासरी २२.३८ क्विंटल असून नागपूर विभागातील प्रति हेक्टरी सरासरी १९.६३ क्विंटल एवढी असल्याचे दिसून येते. पूर्व विदर्भात भाताची उत्पादकता वाढविण्यासाठी डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठांतर्गत कार्यरत असणाऱ्या विभागीय कृषी संशोधन केंद्र सिंदेवाही व कृषी संशोधन केंद्र साकोली या दोन केंद्रांनी विविध भाताच्या जाती विकसित केलेल्या आहेत. हंगाम २०२३-२४ साठी केंद्र सरकारने सामान्य धानासाठी प्रति क्विंटल २१८३ रू. तर अ श्रेणीच्या धानासाठी प्रतिक्विंटल २२०३ रू. हमीभाव जाहीर केलेला आहे. तथापि, मिळणाऱ्या किंमतीपेक्षा बरेच वेळा धानाचा उत्पादन खर्च जास्त असतो. त्यामुळे आज *"कापूस उत्पादक जात्यात तर धान उत्पादक सुपात"* अशी परिस्थिती आहे.

**विदर्भात धान पिकाला पर्याय काय?**

पूर्व विदर्भात धानपट्ट्यातील धान उत्पादकांना तज्ज्ञांच्या मते धानशेतीला पर्याय म्हणून मत्स्य शेती करता येऊ शकते. त्यासाठी शेतकऱ्यांनी आपापल्या शेतीत अर्धा ते एक एकर क्षेत्रावर तलाव खोदून त्यात शास्त्रीय पद्धतीने व व्यापारी तत्त्वावर मत्स्य शेती केल्यास निश्चितपणे धान पिकापासून मिळणाऱ्या एकरी उत्पन्नाच्या ३ ते ४ पटीने जास्त उत्पन्न मत्स्य शेतीपासून मिळू शकते असे या क्षेत्रातील तज्ज्ञांचे मत आहे.

**भारतीय शेती व शेतकऱ्यांसमोरील संकटे दूर करण्यासाठी उपाय योजना:**

**१. पायाभूत सुविधांमध्ये वाढ करावी:** भारतात पायाभूत सुविधांची मोठ्या प्रमाणावर वानवा आहे. शेत रस्ते, रेल्वे मार्ग, पूल, बोगदे, पाणीपुरवठा, वीज, दूरसंचार, बँका, शेतमाल खरेदी विक्रीची सक्षम व पारदर्शक व्यवस्था, शेतमाल साठविण्यासाठी आवश्यक असणारी गोदाम व्यवस्था इत्यादींचा पायाभूत सुविधांमध्ये समावेश होतो. शेती व ग्रामीण विकासासाठी उपरोक्त सर्व पायाभूत सुविधांमध्ये पर्याप्त प्रमाणात विनाविलंब वाढ करणे आवश्यक आहे.

**२. शेती शिक्षण व प्रशिक्षणाची सोय करावी:** शासनाने शेती व्यवसाय आधुनिक पद्धतीने करता यावा याकरिता संपूर्ण देशभर ग्रामपंचायत स्तरावर शेती प्रशिक्षण केंद्र उभारून शेतकऱ्यांना शेतीचे प्रशिक्षण द्यावे. शेतकऱ्यांना शेती, पशुपालन, सेंद्रिय खत निर्मिती, कारागिरी व्यवसाय इत्यादी तसेच शेती व्यवसायाबद्दल आवड निर्माण होण्यासाठी व त्यासंबंधीचे ज्ञान मिळण्यासाठी शालेय व महाविद्यालयीन स्तरावरील अभ्यासक्रमात शेती या घटकाचा समावेश करावा.

**३. गोदाम सोयींत वाढ:** शासनाने प्रत्येक गावात शासकीय गोदाम बांधून अशा गोदामांमध्ये शेतकऱ्यांना आपला शेतमाल साठविण्याची व ज्या शेतकऱ्यांना आवश्यकता आहे अशा शेतकऱ्यांना त्या शेतमालाच्या गोदाम पावतीवर कर्ज मिळण्याची व्यवस्था निर्माण करावी. जेणेकरून शेतकऱ्यांची पैशाची ताबडतोबीची गरज भागविली जाईल व त्यांना आपल्या शेतमालासाठी योग्य किंमत प्राप्त होईल.

**४. शासकीय स्रोतांमार्फत शेतीसाठी पर्याप्त पतपुरवठा व्हावा:** शासनाने देशातील सर्वच शेतकऱ्यांना सहकारी किंवा सरकारी बँकांकडून पर्याप्त प्रमाणात सरसकट ४% दराने कर्ज पुरवठा करावा. केंद्र शासन राबवित असलेल्या किसान क्रेडिट कार्ड योजनेची व्याप्ती वाढवावी. शेती पतपुरवठ्याबाबत आपल्या शासनाने चीनचा आदर्श घ्यावयास हरकत नसावी. चीनमध्ये शेतकऱ्यांना शून्य टक्के दराने कर्ज पुरवठा केला जातो.

**५. शेतमाल प्रक्रिया व अन्य लघु उद्योगांच्या स्थापनेवर भर द्यावा:** ज्या परिसरात जो शेतमाल तयार होत असेल त्याच परिसरात त्यावर प्रक्रिया करणारे उद्योग (उदा. कापूस पट्ट्यात जिनिंग प्रेसिंग, सूतगिरण्या, कापड गिरण्या, तांदळाच्या पिकाच्या पट्ट्यात भातगिरण्या, ऊस पट्ट्यात साखर कारखाने, तेलबिया उत्पादनाच्या पट्ट्यात ऑइल मिल्स इत्यादी) स्थापन करावे. तसेच औद्योगिक माल तयार करणाऱ्या अन्य लघुउद्योगांचीही ग्रामीण भागात स्थापना करावी जेणेकरून शेती व शेतकऱ्यांना मोठा आधार मिळेल.

**६. शेतकऱ्यांच्या शेतमालाला एकूण उत्पादन खर्च (C2) + ५०% एवढा किमान हमीभाव द्यावा:** शासनाने डॉ. एम. एस. स्वामीनाथन आयोगाच्या अहवालानुसार शेतकऱ्यांचा सर्व शेतमाल एकूण उत्पादन खर्च (C2) +५०% एवढ्या किमान हमीभावाने खरेदीची व्यवस्था करावी. त्यासंबंधीचा कायदा करावा व त्यानुसार शेतकऱ्यांच्या शेतमालाची खरेदी करावी जेणेकरून शेतकऱ्यांना त्याच्या कष्टाचा योग्य मोबदला मिळेल.

**७. करार शेती किंवा कंपनी शेती ऐवजी सहकार शेतीवर भर द्यावा:** शासनाने करार शेतीचा कायदा करण्यापेक्षा सामूहिक शेती पद्धतीला प्रोत्साहन द्यावे. जे शेतकरी सामुहिक शेती करतील अशा शेतकऱ्यांना विशिष्ट स्वरूपाचे समाधानकारक अनुदान जाहीर करावे.

**८. उत्कृष्ट दर्जाची बियाणे शासनानेच पुरवावीत:** शासनाने आपल्या कृषी संशोधन संस्था तसेच कृषी विद्यापीठांवर उत्कृष्ट दर्जाची बी-बियाणे तयार करण्याची जबाबदारी सोपवून अशी बियाणे शेतकऱ्यांना शासनामार्फत रास्त किंमतीला पुरवावीत. कोणत्याही परिस्थितीत खाजगी राष्ट्रीय किंवा बहुराष्ट्रीय कंपन्यांना बियाणे निर्मितीचा व विक्रीचा अधिकार देऊ नये. दुसरे म्हणजे सरळ वाणांच्या बियाण्यांच्या निर्मितीवर भर देऊन शेतकऱ्यांचा बियाण्यांवरील खर्च कमी करावा.

**९. माती व पाणी परीक्षण प्रयोगशाळांची आणि पीक मार्गदर्शन केंद्रांची स्थापना करावी:** केंद्र सरकारने संपूर्ण देशात ग्रामपंचायत स्तरावर माती व पाणी परीक्षण प्रयोगशाळा तसेच पीक मार्गदर्शन केंद्रांची स्थापना करावी. अशा प्रयोगशाळांमधून तज्ज्ञांद्वारे गावातील प्रत्येक शेतकऱ्याच्या जमिनीतील माती व पाण्याचे परीक्षण करून संबंधित शेतकऱ्याला त्यासंबंधीचा अहवाल (Report) उपलब्ध करून द्यावा. अशा अहवालाच्या आधारावर पीक मार्गदर्शन केंद्रातील कृषी तज्ञांनी संबंधित शेतकऱ्याच्या जमिनीत कोणते रासायनिक खत किती प्रमाणात टाकावे तसेच त्या जमिनीत कोणती पिके घ्यावीत याबाबत मार्गदर्शन करावे.

**१२. शेतकऱ्यांना रासायनिक शेती कडून नैसर्गिक शेतीकडे वळवावे:** महागडी रासायनिक खते, कीटकनाशके व तणनाशके यांचा शेतीतील वापर वाढल्याने पीक उत्पादनाच्या खर्चात भरमसाठ वाढ झालेली आहे. शेतमालाचा उत्पादन खर्च वाढला परंतु त्या प्रमाणात शेतमालाला किंमत मिळत नसल्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. त्यासाठी शेतकऱ्यांनी महागड्या रासायनिक शेती ऐवजी कमी खर्चाच्या नैसर्गिक (सेंद्रिय) शेतीचा अवलंब करावा. केंद्र सरकारने या अनुषंगाने २०१५ पासून "पारंपारिक कृषी विकास योजना" या नावाने निसर्ग शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी योजना सुरू केलेली आहे. ती अधिकाधिक विस्तारित करण्यावर भर द्यावयास हवा.

याशिवाय, शेतकऱ्यांनी शेतीपूरक जोडधंदा करण्यास प्रोत्साहित करावे; जलसिंचन सोयींत वाढ

करावी; पिक विमा योजना सर्व पिकांना अनिवार्य करावी; शेतकऱ्यांच्या शेतीतील मजुरीची कामे मनरेगा अंतर्गत करून द्यावी; कृषी विकास कार्यक्रमांतर्गत प्रत्येक कोरडवाहू शेतकऱ्याला सरसकट प्रतिएकर खरीप व रब्बी हंगामासाठी स्वतंत्रपणे ५००० रू. अनुदान द्यावे; शेतकरी कुटुंबांना मोफत आरोग्यसेवा व त्यांच्या मुला-मुलींना पदव्यूत्तर पर्यंत मोफत शिक्षणाची व्यवस्था करावी; अल्पभूधारक कोरडवाहू शेतकरी तसेच शेतमजूर कुटुंबाला वयाची ६०वर्षे पूर्ण केल्यानंतर समाधानकारक निवृत्तीवेतन द्यावे; आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाला ५ लाख रु. ची आर्थिक मदत द्यावी; शेती व ग्रामीण विकासासाठी स्वतंत्र अर्थसंकल्प सादर करावा; शेतकऱ्यांनी आपले मजबूत शेतकरी संघटन उभे करावे.

**समारोप :**

निसर्ग, शासन, आणि बाजारपेठ यांच्यातून कोणतेही शेतकऱ्यांच्या बाजूने नसल्याने त्यांची स्थिती गंभीर होत आहे. शेतजमीन, जंगले, खाणी यांसारखी राष्ट्रीय संपत्ती परदेशी व देशी कंपन्यांना बहाल केली जात आहे. औद्योगिकीकरणाच्या नावाखाली उपजाऊ जमीन बिगरशेती कामांसाठी वापरली जात असल्याने शेतकरी भूमिहीन होऊन विस्थापित होत आहेत. यामुळे विशेषतः कोरडवाहू शेती करणाऱ्या शेतकऱ्यांची परिस्थिती अत्यंत दयनीय बनली आहे. सरकारी धोरणे शेतकरीविरोधी असल्याने शेतकरी कर्जबाजारी होऊन आत्महत्या करण्यास प्रवृत्त होतात. शेतकऱ्यांना पुरेसे कर्ज उपलब्ध होत नाही आणि खाजगी सावकारांचे जाचक व्याजदरही त्यांना अडचणीत टाकतात. औद्योगिक कर्जे बँकांच्या एनपीए तरतुदीतून फेडली जात असताना, शेती कर्जांकडे दुर्लक्ष केले जाते. या समस्या सोडवण्यासाठी पाणलोट विकास, सेंद्रिय शेती, पिक विमा, व हमीभाव खरेदीसाठी कायदे अशा उपक्रमांची गरज आहे. तसेच संघटित शेतकरी आंदोलन उभे करून शेतकऱ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे गरजेचे आहे. यामुळेच समतोल व शाश्वत विकास साधता येईल.

**संदर्भसूची:**

१. बोकरे दिवाकर, शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवायच्या कशा?, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे

२. ब्रह्मे सुलभा, शेतकरी जात्यात..., शंकर ब्रह्मे समाज विज्ञान ग्रंथालय, पुणे ४

३. गावंडे नामदेव, शेती विकासाच्या पर्यायी वाटा, महाराष्ट्र राज्य किसान सभा, मुंबई

४. पाध्ये रमेश, शेती, शेतकरी आणि पाणी, श्रमिक प्रतिष्ठान, कोल्हापूर

५. डॉ. पवार जयसिंगराव (संपादक), कॉ. गोविंद पानसरे: समग्र साहित्य, श्रमिक प्रतिष्ठान, कोल्हापूर

६. डॉ. पानसरे मेघा (संपादक), भारतावरील आर्थिक संकट, श्रमिक प्रतिष्ठान, कोल्हापूर

७. डॉ. पुरोहित वसुधा, कृषी अर्थशास्त्र, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगपुरा, औरंगाबाद

८. डॉ. राजपूत करमसिंग, महाराष्ट्राची अर्थव्यवस्था, साई ज्योती पब्लिकेशन, नागपूर

९. डॉ. राजपूत करमसिंग, भारतीय अर्थव्यवस्था, साई ज्योती पब्लिकेशन, नागपूर

१०. डॉ. राजपूत करमसिंग, कापसाची कुळ कथा आणि कापूस उत्पादकांच्या व्यथा, महाराष्ट्र राज्य किसान सभा, मुंबई

१२. वानखडे चंद्रकांत, एका साध्या सत्यासाठी (आत्मचरित्र), परिसर प्रकाशन, अंबाजोगाई

***